# तंत्रशिक्षणासाठी ‘आधार’ची सक्ती



Harsh.Dudhe@timesgroup.com

**पुणे** : राज्यातील तंत्रशिक्षण पदवी, पदव्युत्तर आणि पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी; तसेच शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी आता आधार क्रमांक सक्तीचा करण्यात आला आहे. त्यामुळे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही, त्यांना आगामी सहा महिन्यांत ते काढण्याशिवाय पर्याय नाही. विद्यार्थ्यांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेदरम्यान (कॅप) आधार क्रमांक ‘एआरसी’वर सादर करावा लागणार आहे.

जेईई-मेन ही परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज भरतानाच आधार क्रमांक भरणे सक्तीचे करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर, राज्यातही तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ‘आधार’ सक्तीचे झाले आहे. राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयाने वेबसाइटवर ही माहिती दिली आहे. संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, ‘कॅप’ प्रक्रियेसाठी ‘एआरसी’वर गेल्यानंतर विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेयर, अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला आदी कागदपत्रांसोबतच आधार क्रमांकही द्यावा लागणार आहे. प्रवेशाबरोबरच शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठीही आधार क्रमांक अनिवार्य आहे.

**सहा महिन्यात काढावे लागणार आधार कार्ड**

दरम्यान, आधार क्रमांक नसणाऱ्या विद्यार्थ्याला अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जाणार अथवा नाही, हे डीटीईने स्पष्ट केलेले नाही. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण असून, सर्वांना येत्या सहा महिन्यांत आधार कार्ड काढावे लागणार असून, त्या दृष्टीने आतापासूनच प्रयत्न सुरू करावे लागणार आहेत.

## आधार क्रमांक कशासाठी?

विद्यार्थ्यांना सरकारच्या विविध योजनांचे अनुदान, विविध शिष्यवृत्त्या आणि आर्थिक प्रतिपूर्ती ही ‘आधार पेमेंट ब्रिज सिस्टीम’द्वारे करण्यात बँकेच्या खात्यात करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आधार कार्ड काढून ते बँक खात्याशी जोडायचे आहे.

**विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ‘आधार पेमेंट ब्रिज सिस्टीम’द्वारे बँकेच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे हा लाभ घेण्यासाठी त्यांना ‘आधार कार्ड’ काढावे लागेल. प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यास अद्याप सहा महिने अवधी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आधार कार्ड काढून ठेवावे. आधार क्रमांक नसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार की नाही, याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.**

- डॉ. एस. के. महाजन, संचालक, डीटीई

# उशिरा प्रवेशांबद्दल कारवाईची मागणी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पदवी, पदव्युत्तर आणि पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश उशिराने करणाऱ्या आणि संचालनालयाच्या वेबसाइटवर प्रवेशांची माहिती उशिराने अपलोड करणाऱ्या कॉलेजांवर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने केली आहे. दर वर्षी कॉलेजांकडून अशा प्रकारची हेळसांड केली जाते आणि त्याचा भुर्दंड विद्यार्थ्यांना बसतो. भविष्यात हा प्रकार टाळण्यासाठी संचालनालयाने कायदा करावा, अशी मागणी ‘मनविसे’ने केली आहे.

गेल्या वर्षी संचालनालयाने राबविलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये राज्यात ३३५ विद्यार्थ्यांचे प्रवेश खासगी कॉलेजांकडून उशिराने करून प्रवेशांची माहिती वेबसाइटवर उशिरा करण्यात आली होती. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला होता. यावर मनविसेतर्फे कल्पेश यादव आणि विक्रांत अमराळे यांनी निवेदन दिले होते. त्यावर संचालनालयातर्फे मोठा कालावधी उलटून गेल्यानंतर २४ नोव्हेंबरला मान्यता देण्यात आली.